# भूगोल : बोर्डाची प्रश्नपत्रिका (मार्च 2021)

**वेळ : 2.00 तास]** **[एकूण गुण : 40**

**नोंद :** कोव्हिड-19 मुळे ही परीक्षा घेण्यात आली नाही.

# भूगोल : बोर्डाची प्रश्नपत्रिका (सप्टेंबर 2021)

**(आदर्श उत्तरांसह)**

**वेळ : 2.00 तास]** **[एकूण गुण : 40**

**सूचना :** *(i) सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.*

*(ii) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.*

*(iii) प्रश्न क्र. 4 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या ब्राझील नकाशा-आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

*(iv) प्रश्न क्र. 6 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.*

*(v) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.*

*(vi) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलीचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.*

*(vii) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत, पेन्सिलीने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.*

*(viii) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिसपेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.*

---

**प्र. 1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा : 4**

(1) ॲमेझॉन ही जगातील एक मोठी नदी आहे. या नदीच्या मुखालगत ---------.

*(i) त्रिभूज प्रदेश आहे* *(ii) त्रिभूज प्रदेश नाही*

*(iii) विस्तीर्ण खाड्या आहेत* *(iv) मासेमारी व्यवसाय केला जातो*

(2) भारताचे हवामान --------- प्रकारात मोडते.

*(i) मान्सून* *(ii) शीत कटिबंधीय* *(iii) उष्ण कटिबंधीय* *(iv) समशीतोष्ण कटिबंधीय*

(3) पँटनाल या दलदलीच्या प्रदेशात --------- आढळतात.

*(i) पिऱ्हाना* *(ii) मकाव* *(iii) महाकाय ॲनाकोंडा* *(iv) हिमबिबट्या*

(4) भारताला एकूण सुमारे --------- किमीचा सागरी किनारा लाभला आहे.

*(i) ७,१००* *(ii) ७,४००* *(iii) ७,७००* *(iv) ७,५००*

**प्र. 2. वेगळा घटक ओळखा : 4**

(1) क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य :

(i) नोंदवही (ii) कॅमेरा (iii) नकाशा (iv) सूक्ष्मदर्शक

(2) भारतीय वनस्पती :

(i) देवदार (ii) अंजन (iii) ऑर्किड (iv) वड

(3) मानवी वस्तीस अनुकूल घटक :

(i) वाळवंटी प्रदेश (ii) सुपीक जमीन

(iii) पाण्याची उपलब्धता (iv) अनुकूल हवामान

(4) ब्राझीलमधील नगदी पिके :

(i) कॉफी (ii) सोयाबीन (iii) रबर (iv) मका

**प्र. 3. चूक की *बरोबर* ते सांगा : *(कोणतेही चार)*** 4

(1) ब्राझीलमध्ये जगातील सर्वाधिक वनस्पतीच्या प्रजाती नाहीत.

(2) भारतातील लोकसंख्येचे वितरण असमान आहे.

(3) ब्राझीलमध्ये पर्यावरणस्नेही पर्यटनाचा विकास होत आहे.

(4) भारताच्या मध्यातून मकरवृत्त गेले आहे.

(5) सतलज ही सिंधूची उपनदी आहे.

**प्र. 4. (अ) ब्राझीलच्या नकाशा-आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा : *(कोणतेही चार)*** 4

(1) ब्राझीलची राजधानी

(2) आमापा राज्य


(3) पिको दी नेब्लीना

(4) अवर्षण चतुष्कोण

(5) पॅराना नदी

(6) ब्राझीलमधील सर्वाधिक लोकसंख्येची घनता असलेले राज्य.

**प्र. 4. (आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : *(कोणतेही चार)*** 4



**प्रश्न :**

(1) भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त कोणते?

(2) भारताचे अतिदक्षिणेकडील टोक कोणते?

(3) भारताच्या दक्षिणेकडील देश कोणते?

(4) भारताच्या मध्यभागातून कोणते अक्षवृत्त गेले आहे?

(5) भारताचे उत्तर-दक्षिण अंतर किती आहे?

**प्र. 5. भौगोलिक कारणे लिहा : *(कोणतीही दोन)*** **6**

(1) ब्राझीलच्या वर्षावनांना जगाची फुप्फुसे म्हणतात.

(2) जगाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारा देश म्हणून ब्राझीलकडे पाहिले जाते.

(3) हिमालयातील नद्या बारमाही वाहतात.

(4) आंतरराष्ट्रीय पर्यटक ब्राझीलकडे आकर्षित होतात.

**प्र. 6. (अ) पुढे दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख काढा व त्यापुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

**ब्राझील – नागरी लोकसंख्येची टक्केवारी**

**(१९६० – २०१०)**

| वर्ष | १९६० | १९७० | १९८० | १९९० | २००० | २०१० |
|---|---|---|---|---|---|---|
| नागरी लोकसंख्येची टक्केवारी | ४७.१ | ५६.८ | ६६.० | ७४.६ | ८१.५ | ८४.६ |

**प्रश्न :**

(1) वरील आकडेवारीतील वर्षांतर किती आहे?


(2) कोणत्या दशकात नागरीकरणाचा वेग कमी झालेला दिसतो?


(3) १९७० ते १९८० या दशकात किती टक्क्यांनी नागरीकरणात वाढ झाली आहे?

***किंवा***

**प्र. 6. (आ) पुढे दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

**आयुर्मान :**






**प्रश्न :**

(1) कोणत्या देशाचे सरासरी आयुर्मान जास्त आहे?

(2) १९९० ते २०१० या दशकात भारतीय आयुर्मानात किती वाढ दिसते?

(3) १९९० ते २०१६ दरम्यान ब्राझीलमध्ये आयुर्मानात किती वाढ झाली?

(4) २००० साली भारत व ब्राझीलमधील आयुर्मानात किती फरक आहे?

(5) कोणत्या देशात वृद्धांचे प्रमाण जास्त आहे?

(6) १९८० मधील भारतातील सरासरी आयुर्मान हे ब्राझीलमध्ये कोणत्या वर्षी होते?

**प्र. 7. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *(कोणतेही दोन)*** **8**

(1) क्षेत्रभेट म्हणजे काय? क्षेत्रभेटीत तुम्ही कोणते साहित्य बरोबर घ्याल?

(2) भारताच्या हवामानातील हिंदी महासागर व हिमालयाचे महत्त्व सांगा.

(3) भारत व ब्राझील या देशांत चालणाऱ्या मासेमारी व्यवसायातील साम्य व फरक कोणते?

# बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरे (सप्टेंबर 2021)

**प्र. 1.**

(1) ॲमेझॉन ही जगातील एक मोठी नदी आहे. या नदीच्या मुखालगत त्रिभूज प्रदेश नाही.

(2) भारताचे हवामान मान्सून प्रकारात मोडते.

(3) पँटनाल या दलदलीच्या प्रदेशात महाकाय ॲनाकोंडा आढळतात.

(4) भारताला एकूण सुमारे ७,५०० किमीचा सागरी किनारा लाभला आहे.

**प्र. 2.**

(1) वेगळा घटक : सूक्ष्मदर्शक

(2) वेगळा घटक : ऑर्किड

(3) वेगळा घटक : वाळवंटी प्रदेश

(4) वेगळा घटक : मका.

**प्र. 3.**

(1) ब्राझीलमध्ये जगातील सर्वाधिक वनस्पतीच्या प्रजाती नाहीत. — चूक


(2) भारतातील लोकसंख्येचे वितरण असमान आहे. — बरोबर

(3) ब्राझीलमध्ये पर्यावरणस्नेही पर्यटनाचा विकास होत आहे. — बरोबर

(4) भारताच्या मध्यातून मकरवृत्त गेले आहे. — चूक

(5) सतलज ही सिंधूची उपनदी आहे. — बरोबर.

**प्र. 4. (अ)**



**प्र. 4. (आ)**

(1) ८२°३०′ पूर्व हे भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त आहे.

(2) इंदिरा पॉइंट हे भारताचे अतिदक्षिणेकडील टोक होय.

(3) श्रीलंका व मालदीव हे भारताच्या दक्षिणेकडील देश होत.

(4) भारताच्या मध्यभागातून कर्कवृत्त गेले आहे.

(5) भारताचे उत्तर-दक्षिण अंतर ३,२०० किमी आहे.

**प्र. 5.**

**(1)** (१) ब्राझील देशात उत्तरेकडील ॲमेझॉन नदीच्या खोऱ्याच्या प्रदेशात घनदाट सदाहरित वर्षावने आढळतात.

(२) या वर्षावनांतील वनस्पती मोठ्या प्रमाणावर वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे शोषण करतात व वातावरणात मोठ्या प्रमाणात ऑक्सिजनचे (प्राणवायूचे) उत्सर्जन करतात.

(३) या वर्षावनांमुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. म्हणूनच या वनांना 'जगाची फुप्फुसे' असे संबोधतात.

**(2)** (१) ब्राझील हा देश तीन शतकांपेक्षा अधिक काळ पोर्तुगीजांच्या आधिपत्याखाली होता.

(२) विसाव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात जागतिक वित्तीय समस्यांमधून हा देश सावरला आहे.

(३) भविष्यातील एक प्रमुख बाजारपेठ या दृष्टीने ब्राझीलकडे पाहिले जाते. अशा प्रकारे, जगाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारा देश म्हणून ब्राझीलकडे पाहिले जाते.

**(3)** (१) हिमालयातील बहुतांश नद्या अतिउंचावरील बर्फाच्छादित पर्वतशिखरांमधून उगम पावतात.

(२) उन्हाळ्यात बर्फ वितळल्यामुळे उन्हाळ्यातही या नद्यांना पाणी मिळते.

(३) पावसाळा, हिवाळा व उन्हाळा या तिन्ही ऋतूंत पाणीपुरवठा होत असल्यामुळे हिमालयातील जवळजवळ सर्व नद्या बारमाही स्वरूपाच्या आहेत.

**(4)** आंतरराष्ट्रीय पर्यटक ब्राझीलकडे पुढील घटकांमुळे आकर्षित होतात :

(१) पांढऱ्याशुभ्र वाळूच्या पुळणी.

(२) निसर्गरम्य व स्वच्छ सागरी किनारे.

(३) निसर्गरम्य बेटे.

(४) ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील सदाहरित घनदाट वर्षावने.


(५) विविध प्रजातींचे प्राणी व पक्षी.

(६) विविध उद्याने.

(७) ब्राझिलिया, रिओ दी जनेरिओ, सावो पावलो इत्यादी मोठी शहरे.

(८) मॅनॉस बंदर व फुटबॉल स्टेडिअम इत्यादी.

प्र. 6. (अ)




(1) वरील आकडेवारीतील वर्षांतर १० वर्षे आहे.

(2) २००० ते २०१० या दशकात नागरीकरणाचा वेग कमी झालेला दिसतो.

(3) १९७० ते १९८० या दशकात ९.२ टक्क्यांनी नागरीकरणात वाढ झाली आहे.

प्र. 6. (आ)

(1) ब्राझील देशाचे सरासरी आयुर्मान जास्त आहे.

(2) १९९० ते २०१० या दशकात भारतीय आयुर्मानात ९ वर्षांची वाढ दिसते.

(3) १९९० ते २०१६ दरम्यान ब्राझीलमध्ये आयुर्मानात १० वर्षांची वाढ झाली आहे.

(4) २००० साली भारत व ब्राझीलमधील आयुर्मानात ७ वर्षांचा फरक आहे.

(5) ब्राझील देशात वृद्धांचे प्रमाण जास्त आहे.

(6) १९८० मधील भारतातील सरासरी आयुर्मान हे ब्राझीलमध्ये १९६० या वर्षी होते.

प्र. 7.

**(1) (अ) अर्थ :** (१) भूगोल हे निरीक्षणाद्वारे शिकण्याचे शास्त्र आहे.

(२) भूगोलासाठी संपूर्ण पृथ्वी ही प्रयोगशाळा मानली जाते.

(३) संपूर्ण पृथ्वीचा प्रत्यक्ष भेटीद्वारे अभ्यास करणे शक्य नसते.

(४) त्यासाठी विशिष्ट ठिकाणाची निवड करून नमुन्यादाखल प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन अभ्यास केला जातो, त्यास 'क्षेत्रभेट' असे म्हणतात.

**(ब) क्षेत्रभेटीसाठी साहित्य :** क्षेत्रभेटीसाठी आम्ही पुढील साहित्य घेऊ :

(१) माहितीची नोंद करण्यासाठी नोंदवही, पेन, पेन्सिल, मोजपट्टी, कॅमेरा, दुर्बीण इत्यादी.

(२) स्थानाच्या दिशानिश्चितीसाठी होकायंत्र व सखोल अभ्यासासाठी नकाशे.

(३) क्षेत्रभेटीच्या हेतूनुसार माहिती संकलनासाठी नमुना प्रश्नावली.

(४) क्षेत्रातील पाण्याचे, मातीचे, कचऱ्याचे, वनस्पतींचे, दगडांचे नमुने गोळा करण्यासाठी कागदी पिशवी अथवा बंद झाकणाचे डबे. याशिवाय, टोपी, पाण्याची बाटली, प्रथमोपचार पेटी इत्यादी.

**(2)** (१) हिंदी महासागराचा व हिमालय पर्वताचा भारतीय हवामान व मान्सून (पर्जन्य) निर्मितीवर मोठा प्रभाव पडतो.

(२) पंजाबच्या मैदानी प्रदेशात व राजस्थानच्या थरच्या वाळवंटात उष्ण हवामान असते. त्यामुळे या प्रदेशांत उन्हाळ्याच्या सुरुवातीला कमी दाबाचा पट्टा निर्माण होतो.

(३) हिंदी महासागरावर तुलनेने अधिक दाबाची हवा असल्यामुळे हिंदी महासागरातील जास्त दाबाच्या पट्ट्याकडून भारताच्या मुख्य भूमीकडे नैर्ऋत्य दिशेकडून वारे वाहू लागतात.

(४) नैर्ऋत्य मोसमी वारे बाष्पयुक्त असतात व या वाऱ्यांमुळे भारतात पाऊस पडतो.

(५) हिमालयामुळे उत्तरेकडून येणारे अतिथंड वारे अडवले जातात. त्यामुळे भारतातील उत्तरेकडील भागाचा अतिथंड वाऱ्यांपासून बचाव होतो.

(६) भारताच्या मुख्य भूमीवरून वाहणारे नैर्ऋत्य मोसमी वारेही हिमालयाच्या शिवालिक व हिमाचल रांगांद्वारे अडवले जातात.

(७) नैर्ऋत्य दिशेकडून वाहणारे वारे शिवालिक व हिमाचल रांगांच्या ठिकाणी दिशा बदलतात व तेथून हे वारे परत हिंदी महासागराकडे ईशान्य दिशेकडून मागे फिरतात.

(८) ईशान्य दिशेकडून वाहणाऱ्या या ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारताच्या द्वीपकल्पीय भागांत पुन्हा मान्सून परतीचा पाऊस पडतो.

**(3) (अ) भारत व ब्राझील या देशांत चालणाऱ्या मासेमारी व्यवसायातील साम्य :**

(१) भारत व ब्राझील या देशांतील किनारपट्टीच्या भागात मासेमारी व्यवसाय परंपरेने चालत आला आहे व विकसित झाला आहे.

(२) भारत व ब्राझील या दोन्ही देशांत खाऱ्या पाण्यातील मासेमारी केली जाते.

**(ब) भारत व ब्राझील या देशांत चालणाऱ्या मासेमारी व्यवसायातील फरक :**

(१) भारतात नद्या, तळी, सरोवरे इत्यादी ठिकाणी गोड्या पाण्यातील मासेमारी केली जाते. परंतु, ब्राझीलमध्ये प्राकृतिक रचना, घनदाट जंगले, नद्यांच्या पाण्याचा वेग यांमुळे गोड्या पाण्यातील मासेमारी विकसित झालेली नाही.

(२) ब्राझीलजवळ उष्ण व सागरी प्रवाह एकत्र येतात. प्रवाहांच्या संगमाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्लवक वाढते. प्लवक हे माशांचे खाद्य असल्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मासे आढळतात. परिणामी, ब्राझीलमध्ये मासेमारी व्यवसाय विकसित झाला आहे. याउलट, भारताजवळ अशा प्रकारे सागरी प्रवाह एकत्र येत नसूनही इतर अनुकूल घटकांमुळे भारतात मासेमारी व्यवसाय विकसित झाला आहे.

---

❋ ❋ ❋